पुण्येनगरी दि. 19/05/20

# दरोड्याच्या तयारीतील ५ जण तर लूटमार

## पिस्टल, काडतुसे, धारदार तलवारी जप्त

**नांदेड/ प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यांपासून शहर व जिल्हा गुन्हेगारी घटनांनी हादरुन गेला आहे. परिणामी पोलीस यंत्रणेवर दोषारोप केले जात आहेत. त्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी स्थागुशा व गुन्हे शोध पथकांना गुन्हेगारांचा शोध घेण्याचे फर्मान सोडले आहे. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दरोडेखोरांची टोळी पकडली असून त्यांच्याकडून हत्यारे व सामग्री जप्त करण्यात आली आहे.

१७ मे रोजी स्थागुशाचे पोलीस पथक गस्तीवर असताना कौठा भागातील मामा चौकाच्या बाजूस अहिल्यादेवी होळकर पुलाच्या बाजूस ते भगतसिंघ चौकादरम्यान जाणाऱ्या-येणाऱ्यांना लूटण्याच्या तयारीत काही जण मोदी मैदानाजवळ थांबले होते अशी माहिती मिळाल्यानंतर स्थागुशाचे उपनिरीक्षक दत्ता काळे व त्यांचे सहकारी



त्या भागात गेले. या पथकाला पाच जण तेथे आढळले. त्यांची चौकशी केली असता त्यांनी आपली नावे कमलेश उर्फ अशु पाटील बालाजी लिंबापुरे रा. वसरणी नांदेड, शाम मुंजाजी सोनटक्के रा. जुना कौठा नांदेड, शिवाजी ऊर्फ शिवा माधवराव थेटे रा. टाकळगाव ता. लोहा, काळेश्वर रावण जाधव रा. असर्जन नांदेड,दीपक भुजंग बुचाले रा. अवई ता. पुर्णा जि. परभणी अशी सांगितली. त्यांच्या ताब्यातून गावठी पिस्टल (अग्नीशस्त्र), ४ जिवंत काडतुसे, एअरगन,२ धारदार तलवारी, दोरी व मिरचीपुड असे साहित्य मिळून आले. त्यांना विश्वासात घेऊन विचारपुस केली. त्यांनी त्या ठिकाणी अपरात्री थांबण्याबाबत समाधानकारक उत्तर दिले नाहीत.

या उलट आरोपी कमलेश ऊर्फ अशु पाटील बालाजी लिंबापुरे रा. वसरणी नांदेड, शाम मुंजाजी सोनटक्के रा. जुना कैठा नांदेड व शिवाजी उर्फ शिवा माधवराव थेटे रा. टाकळगाव ता.लोहा यांच्याविरुध्द पोलीस अभीलेखावर जबरी चोरी, धारदार शस्त्र बाळगणे, दुखापत, गंभीर दुखापत यासारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे आढळून आले आहे. सदर आरोपींविरुध्द फौजदार दत्तात्रय काळे यांनी दिलेल्या **(पान ४ वर..)**

भारी दि. 19/05/२०२२

# ण तर लूटमार करणारे तिघे जेरबंद

अवई ता. पुर्णा जि. परभणी अशी सांगितली. त्यांच्या ताब्यातून गावठी पिस्टल (अग्नीशस्त्र), ४ जिवंत काडतुसे, एअरगन, २ धारदार तलवारी, दोरी व मिरचीपुड असे साहित्य मिळून आले. त्यांना विश्वासात घेऊन विचारपुस केली. त्यांनी त्या ठिकाणी अपरात्री थांबण्याबाबत समाधानकारक उत्तर दिले नाहीत.

या उलट आरोपी कमलेश ऊर्फ अशु पाटील बालाजी लिंबापुरे रा. वसरणी नांदेड, शाम मुंजाजी सोनटक्के रा. जुना कैठा नांदेड व शिवाजी उर्फ शिवा माधवराव थेटे रा. टाकळगाव ता.लोहा यांच्याविरुध्द पोलीस अभीलेखावर जबरी चोरी, धारदार शस्त्र बाळगणे, दुखापत, गंभीर दुखापत यासारखे गंभीर गुन्हे दाखल असल्याचे आढळून आले आहे. सदर आरोपींविरुध्द फौजदार दत्तात्रय काळे यांनी दिलेल्या (पान ४ वर..)

**नांदेड/ प्रतिनिधी**

धनेगाव कापूस केंद्रासमोर डोळ्यात मिरचीची पूड टाकून व्यापाऱ्याला लुटणाऱ्या तिघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले आहे.

वाजेगाव येथे किराणा दुकान चालविणारे व्यापारी १५ मे रोजी रात्री दुकान बंद करुन ४ लाख रुपये घेऊन स्कुटीवरुन आपल्या घराकडे जात होते. तेव्हा या व्यापाऱ्याच्या पाळतीवर असलेल्या तिघांनी धनेगाव कापूस संशोधन केंद्रासमोर दुचाकी आडवी लावून या व्यापाऱ्याला अडविले आणि डोळ्यात मिरचीची पूड टाकून त्यांच्याकडील रोकड व स्कुटी घेऊन आरोपी पळून गेले. याबाबत सदर व्यापाऱ्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात तीन अज्ञात आरोपींविरुध्द गुरनं २८६/२२ कलम ३९२,३४, हत्यार कायदा कलम ४/२५ दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस अधीक्षकांनी स्थानिक गुन्हे शाखेला तपासाला लावले.

## धनेगावमधील लूटमारीचा उलगडा



१८ मे रोजी नांदेड ग्रामीण हद्दीतील एका फंक्शन हॉलजवळ हे आरोपी असल्याची गुप्त माहिती मिळाल्यावरुन स्थागुशाच्या पथकाने तिकडे मोर्चा वळविला. त्या ठिकाणी सोहेब खान शब्बीर खान २१ रा.वाजेगाव याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्हा कबुल केला.तसेच सोबत ४ जण होते असेही सांगितले. त्यावरुन इतर आरोपींचा शोध घेतला असता नूरखान हुसेन खान पठाण ३५ रहिमपूर,दूध डेअरी नांदेड, (पान ४ वर..)